आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ मे २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार थंडावला / राज्यातल्या ११ मतदारसंघात सर्वच पक्षांच्या दिग्गज नेत्यांच्या प्रचारसभा
- छत्तीसगडमधल्या दंतेवाडा जिल्ह्यात ३५ माओवाद्यांचं आत्मसमर्पण
- बांग्लादेशात ३ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर होणाऱ्या महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा कार्यक्रम जाहीर / भारताचा सलामीचा सामना ४ ऑक्टोबरला

  **आणि**

- राज्यात उष्णतेची लाट कायम, पुढील दोन दिवसांत मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातला प्रचार आज थंडावला.  राज्यातल्या ११ मतदारसंघात सर्वच पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला होता. ठिकठिकाणी विविध पक्षांच्या नेत्यांच्या प्रचारसभा प्रचारफेऱ्या होत होत्या. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर शहरात काँग्रेस नेते अमित देशमुख यांनी सभा घेतली.

**बारामती** मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभा घेतली, तर महाविकास आघाडीच्या उमेदवार आणि विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांनी मतदारांना साद घातली.

**सांगली** लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ मिरज इथं विकसित भारत@2047 संवाद मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मार्गदर्शन केलं.

**माढा** मतदारसंघातले उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारासाठी गडकरी यांनी टेंभुर्णे इथं सभा घेतली, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण इथं सभा घेतली. देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर इथं महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्यासाठीही मतदानाचं आवाहन केलं.

**कोल्हापूर** इथं महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. युतीतील मित्रपक्षांचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाले होते. महाविकास आघाडीचे उमेदवार छत्रपती शाहूमहाराज यांच्या प्रचारासाठी विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांची सभा झाली.

**पालघर मतदारसंघात** भाजपचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांनी आज सकाळी विरारच्या सुप्रसिद्ध जीवदानी देवी मंदिरात दर्शन घेऊन, प्रचाराला सुरुवात केली. सावंतवाडीमधे भाजपा उमेदवार नारायण राणे यांनी प्रचारसभा घेतली.

या टप्प्यात राज्यातल्या रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले, सांगली, सोलापूर, बारामती, उस्मानाबाद, लातूर, माढा, आणि सातारा, या ११ मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज पंचाहत्तर आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीतल्या निवडणुकीच्या विविध पैलूंची माहिती दिली. ते आज दुपारी नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. तेवीस देशांच्या निवडणूक व्यवस्थापन मंडळांचे आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी लोकसभा निवडणुकीचे साक्षीदार होण्यासाठी कालपासून भारत भेटीवर आले आहेत.

महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या सहा राज्यांना भेटी देऊन हे प्रतिनिधी विविध मतदारसंघातील निवडणुका आणि संबंधित तयारीचं निरीक्षण करणार आहेत. नऊ मे रोजी या उपक्रमाचा समारोप होईल.

<><><><><>

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून जे. पी. गावीत यांची उमेदवारी मागे घेतली आहे. भाजपच्या उमेदवाराचा पराभव सुनिश्चित करता यावा यासाठी उमेदवारी मागे घेतल्याचं माकपनं म्हटलं आहे. उमेदवारी मागे घेतल्यानंतर माकपनं दिंडोरी मतदारसंघातले इंडिया आघाडीचे उमेदवार  भास्कर भगरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

<><><><><>

राज्यात २० मे रोजी होणाऱ्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचारासाठी काँग्रेसनं आपल्या ४० स्टार प्रचाराकांची यादी जाहीर केली आहे. या यादीत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे,  काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस सरचिटणीस

प्रियांका गांधी, काँग्रेस नेते राहूल गांधी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, मुंबई प्रदेश काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड, पृथ्वीराज चव्हाण, चंद्रकांत हंडोरे, यशोमती ठाकूर आदि सदस्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीने प्रचारासाठी आघाडीच्या वर्तमानपत्रात आज प्रसिद्ध केलेली जाहिरात मतांचं ध्रुवीकरण करणारी असल्याची तक्रार काँग्रेसने केली आहे. प्रदेश काँग्रेस च्या शिष्टमंडळाने आज राज्याच्या अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेऊन भाजपासह महायुतीच्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करून त्यांच्यावर आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करावेत अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण पुणे आणि शिरुर लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या दंतेवाडा जिल्ह्यात आज ३५ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण केलेल्या तीन माओवाद्यांवर बक्षीस घोषित करण्यात आलं होतं. दंतेवाडा पोलिसांच्या लोन वरतु मोहिमे अंतर्गत या माओवाद्यांनी दंतेवाडा रेंजचे डीआयजी पोलीस कमलोचन कश्यप आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलं. या माओवाद्यांना सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणांतर्गत प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी पंचवीस हजार रुपये दिले जातील.

<><><><><>

विदर्भ मराठवाड्याच्या सीमेवर खंबाळा इथं निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या भिंतींचं बांधकाम अचानक सुरु झाल्याचा धरण विरोधी संघर्ष समितीने निषेध केला आहे. यासंदर्भात आचारसंहिता संपल्यानंतर बैठक घेऊन निर्णय घेऊ असं आश्वासन निवडणूक प्रचारादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं होतं असं संघर्ष समितीचं म्हणणं आहे. मात्र मतदान झाल्याबरोबर पाटबंधारे विभागाने काम सुरु केलं असून, उद्या ६ मे रोजी हे काम बंद पाडण्याचा इशारा प्रकल्प विरोधकांनी दिला आहे.

<><><><><>

बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व कॉंक्रिट रस्त्यांच्या कामांमध्ये जंक्शनच्या ठिकाणी एकसमान डांबरी थराने सपाटीकरण करण्याचे काम तसंच सिमेंट कॉंक्रिटीकरणाची कामंही ३१ मे २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले. तसंच अपूर्ण अवस्थेत असलेल्या सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्यांच्या ठिकाणी पावसाळ्याच्या काळात नागरिकांची गैरसोय होणार नाही, अशा पद्धतीनं आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे झालेल्या एका कार अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला असून २ जण जखमी झाले आहेत. जखमींना छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. एका अज्ञात वाहनाने पाठीमागून टक्कर दिल्याने हा अपघात झाला.

<><><><><>

ख्यातनाम अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक क्षितिज झारापकर यांचं आज सकाळी मुंबईत निधन झालं. ते ५४ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून ते रुग्णालयात उपचार घेत होते.

क्षितिज झारापकर यांनी गोळाबेरीज, ठेंगा, एकुलती एक, आयडियाची कल्पना आदी चित्रपटांतून भूमिका केल्या. तसंच विविध चित्रपट आणि नाटकांचं दिग्दर्शन आणि लेखन केलं.

**<><><><><>**

महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटना आयसीसीने जाहीर केला आहे. येत्या ३ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर दरम्यान बांग्लादेशात ही स्पर्धा होईल. १० देशांचे संघ १८ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत एकूण २३ सामने खेळतील. उद्घाटनाचा सामना दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडदरम्यान होणार आहे. ८ देशांच्या संघांची थेट निवड झाली असून उर्वरित दोन संघ अबूधाबी इथं सुरु असलेल्या पात्रता स्पर्धेतून निवडले जातील. त्यासाठी श्रीलंका, यूएई, आयर्लंड आणि स्कॉटलंडमधे चुरस आहे. भारताचा समावेश अ गटात असून सोबत न्यूझीलंड, पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियाचे संघ आहेत. ब गटात बांग्लादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका यांची थेट निवड झाली आहे.

भारताचा सलामीचा सामना ४ ऑक्टोबरला सिल्हेट इथं होणार आहे.

**<><><><><>**

मराठवाड्यासह राज्यात उष्णतेची लाट कायम आहे. कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ दिसून येत आहे. परभणी इथं ४३ पूर्णांक ६ , नांदेड इथं ४३ पूर्णांक २, बीड ४३ पूर्णांक १, छत्रपती संभाजीनगरचं तापमान ४१ पूर्णांक सहा, तर सोलापूरात ४३ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली

आहे. वाढत्या तापमानामुळे नांदेड शहरात चारचाकी वाहनानं पेट घेतल्याची घटना घडली.

विदर्भ आणि मराठवाड्यात येत्या २४ तासांत तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा तसंच मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचीही शक्यता आहे. उर्वरित महाराष्ट्रात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//